नि० ९४९

-क-

~~सरतपास प्रथमा वादीतर्फे~~

ता०दि० २५/११/२०१६

# देवगड येथील मे. दिवाणी न्यायाधीश यांचे कोर्टात

नि. दि. मु. नं. ८८/२०१०

श्री. मारूती सखाराम तावडे वगैरे ..... वादी

वि.

श्री. विजय शंकर तावडे वगैरे ..... प्रतिवादी

## वादीचे सरतपासाचे ॲफिडेव्हिट

मी वादी श्री. मारूती सखाराम तावडे, वय सु ८१, धंदा निवृत्त, रा. मु. पो वाडा, ता देवगड, जि. सिंधुदुर्ग सत्यप्रतिज्ञेवर असे कथन करतो की,

१) प्रस्तुत दाव्यातील मिळकती व पक्षकार माझे माहितीचे आहेत. प्रस्तुत दाव्यातील वादी नं. २ माझा सख्खा पुतण्या असून मी स्वत:करिता व वादी नं. २ करिता जबाब देत आहे.

२) वादीचे दाव्यातील परिशिष्टामधील दावा मिळकती या वादी व प्रतिवादी नं. १ ते १२ व प्रतिवादी नं. १४ ते २१ यांच्या एकत्र कुटूंबाच्या समाईक मालकी हक्काच्या आणि वहिवाटीच्या मिळकती आहेत. वादी — प्रतिवादींचे पूर्वाधिकारी आबाजी साबाजी तावडे हे होते. त्यांना रामचंद्र, सखाराम, शिवराम, लक्ष्मण आणि पर्शुराम असे पाच मुलगे होते. ते पाचही मुलगे मयत आहेत. प्रस्तूत वादी नं. १ हे सखाराम यांचे मुलगे असून प्रतिवादी नं. ५ हे वादी नं. १ चा मयत भाऊ शांताराम यांचा मुलगा आहे. तर प्रतिवादी नं. ६ हे वादी नं. १ चे सख्खे बंधू आहेत. दावा मिळकतीचे रे. ऑ. रा. सदरी सखाराम यांचे शाखेसाठी वादी नं. १ प्रतिवादी नं. ५, ६ यांची नावे दाखल आहेत. प्रस्तूत दाव्यातील वादी नं. २ हे आबाजी यांचा मुलगा रामचंद्र व त्यांचा मुलगा लाडकोजी यांचा मुलगा असून वादी नं.२ याला प्रतिवादी ४ हा भाऊ आहे. वादी नं. २ याला प्रतिवादी नं. ४ याचेसह अरूण नावाचा एक भाऊ व तीन बहिणी आहेत. प्रतिवादी नं. ४ याचे नाव लाडकोजी यांचे शाखेचा प्रमुख म्हणून रे. ऑ. रा. सदरी दाखल आहे. प्रस्तूत दाव्यातील प्रतिवादी नं. १ ते ३ हे आबाजी यांचे मुलांतील पर्शुराम याचे शाखेपैकी पर्शुरामचा मुलगा शंकर असून त्याचे वारस प्रतिवादी नं. १ ते ३ आहेत व त्यांची नावे पर्शुराम यांचे शाखेकरीता त्याचे हिश्यास दाखल आहेत. त्यापैकी प्रतिवादी नं. १ मयत असून त्याला कोणी वारस नसल्यामुळे त्याचे नाव दाव्यातून कमी केले आहे. पर्शुरामच्या मुली प्रस्तुत दाव्याचे कामी प्रतिवादी नं. १८ ते २१ असून त्यापैकी प्रतिवादी नं. १९ सुनंदा ही मयत झाल्यामुळे व

...२...

M Tawde

RSR

25/11/16
C.J.J.D.

Received copy
(Adv. U. U. Narkar)

प्रत घेतली
Tawde
16/8/2017

Asstt. Supdt
Civil Court, Devgad

तिला कोणी वारस नसल्यामुळे तिचे नाव दाव्याचे मथळयातून कमी केलेले आहे. आबाजी यांचा मुलगा शिवराम मयत असून त्याचा मुलगा नामदेव हाही मयत आहे. प्रतिवादी नं. ७ ते ९ हे नामदेव यांचे वारस असून प्रतिवादी नं. १० ही नामदेव यांची पत्नी आहे. त्यांची नावे शिवराम यांचे शाखेकरीता रे. ऑ. रा. सदरी दाखल आहेत. आबाजी यांचा पाचवा मुलगा लक्ष्मण मयत असून प्रतिवादी नं. ११ हा लक्ष्मण यांचा मुलगा असून प्रतिवादी नं. १२ ही लक्ष्मण यांचा मयत मुलगा यशवंतची पत्नी आहे. प्रतिवादी नं. ११ व १२ यांची नावे दावा मिळकतीचे रे. ऑ. रा. सदरी त्यांचे शाखेचे हिश्यास दाखल आहेत. दावा मिळकतीमध्ये आबाजी यांचे पाच मुलांचा प्रत्येकी १/५ हिस्सा असून त्याप्रमाणे प्रत्येकाचे शाखा प्रमुखांची नावे आणेवारीने रे. ऑ. रा. सदरी दाखल आहेत. दावा मिळकतीमध्ये वादी नं. १ व प्रतिवादी नं. ५,६ यांचे शाखेचा १/५ हिस्सा असून वादी नं. २ व प्रतिवादी नं. ४ यांचे शाखेचा १/५ हिस्सा आहे. प्रतिवादी नं. १ ते ३ यांचे शाखेचा दावा मिळकतीमध्ये १/५ हिस्सा असून प्रतिवादी नं. ७ ते १० यांच्या शाखेचा १/५ हिस्सा आहे. तर प्रतिवादी नं. ११ व १२ यांचे शाखेचा दावा मिळकतीमध्ये १/५ हिस्सा आहे. वादी व प्रतिवादी नं. १ ते १२ यांची नावे त्यांच्या त्यांच्या शाखेचा प्रमुख म्हणून रे. ऑ. रा. सदरी आणेवारीने दाखल आहेत.

३) दावा मिळकतीपैकी वाडे गावच्या मिळकतींचे रे. ऑ. रा. सदरी अदयाप मयत यशवंत लक्ष्मण तावडे व नामदेव शिवराम तावडे यांची नावे त्यांचे हिश्यास दाखल असून त्यांचे वारसांना याकामी पक्षकार केले आहे. तर मौजे वाडातर येथील मिळकतींचे रे. ऑ. रा. सदरी मयत पर्शुराम आबाजी तावडे यांचे नाव त्यांचे हिश्यास दाखल असून त्यांचे वारसांना या दाव्याचेकामी पक्षकार केले आहे.

४) वर नमुद केल्याप्रमाणे दावा मिळकती या वादी व प्रतिवादी नं. १ ते १२ यांच्या एकत्र कुटूंबाच्या समाईक मालकी हक्काच्या आणि वहिवाटीच्या मिळकती असून प्रत्येक शाखांची त्यांचे त्यांचे अंदाजे हिश्याचे क्षेत्रात वहिवाट आहे. मात्र दावा मिळकतींचे अदयाप सरस, निरस व रहारास्त वाटप झालेले नाही.

५) वादी व प्रतिवादी ४ ते १२ यांच्या शाखांनी सन १९७५ पासून २००० पर्यंतच्या कालावधीत दावा मिळकतीमधील आपापले अंदाजे हिश्याचे क्षेत्रात हापूस कलमांची लागवड स्वखर्चाने केलेली आहे. वादी नं. १ यांचे शाखेने सन १९७५ ते २००० पर्यंत दावा मिळकतीपैकी स. नं. १५२, हि. नं. २ या मिळकतीमध्ये सुमारे ८५ हापूस आंबा कलमांची, स. नं. ८४ हि. नं. २ या मिळकतीमध्ये सुमारे ५ हापूस आंबा कलमांची, स. नं. ९० हि. नं. ३ यामध्ये सुमारे २० हापूस आंबा कलमांची व स. नं. १०१ हि. नं. ८८ या मिळकतीमध्ये सुमारे २० हापूस आंबा कलमांची लागवड केलेली आहे. वादी नं. २ यांचे शाखेने स. नं. १५२ हि. नं. २ या मिळकतीमध्ये सुमारे १०० हापूस आंबा कलमांची, स. नं. ८४ हि. नं. २ या मिळकतीमध्ये सुमारे



Asstt.
Civil Court,

११ हापूस कलमांची, स. नं. ९० हि. नं. ३ या मिळकतीमध्ये ४ हापूस आंबा कलमांची लागवड केलेली आहे व स. नं. १०१ हि. नं. २८ या मिळकतीमध्ये २० हापूस आंबा कलमांची लागवड केलेली आहे. प्रतिवादी नं. ७ ते १० यांचे शाखेने स. नं. १५२, हि. नं. २ या मिळकतीमध्ये सुमारे ४० हापूस आंबा कलमांची, स. नं. ८४ हि. नं. २ या मिळकतीमध्ये सुमारे ३ हापूस आंबा कलमांची, स. नं. १०१ हि. नं. ८८ या मिळकतीमध्ये ८ हापूस आंबा कलमांची लागवड केलेली आहे. तर प्रतिवादी नं. ११ व १२ यांचे शाखेने दावा मिळकतीपैकी स. नं. १५२ हि. नं. २ या मिळकतीमध्ये सुमारे ६० हापूस आंबा कलमांची, स. नं. ८४ हि. नं. २ या मिळकतीमध्ये सुमारे ४ हापूस आंबा कलमांची, स. नं. ९० हि. नं. ३ या मिळकतीमध्ये २ हापूस आंबा कलमांची तर स. नं. १०१ हि. नं. २८ या मिळकतीमध्ये सुमारे ५ हापूस आंबा कलमांची लागवड केलेली आहे. तसेच वर नमुद चार शाखांची (प्रतिवादी नं. १ ते ३ यांची शाखा वगळता) स. नं. १७३ हि. नं. ४, स. नं. १७४ हि. नं. १४ व स. नं. १७६ हि. नं. १९ या मिळकतींचा एकक्षेत्री प्लॉट करून त्यात वादी नं. १ यांचे शाखेने सुमारे ५५ हापूस आंबा कलमांची, वादी नं. २ यांचे शाखेने सुमारे ७० हापूस आंबा कलमांची, प्रतिवादी नं. ७ ते १० यांचे शाखेने सुमारे ५५ हापूस आंबा कलमांची, प्रतिवादी नं. ११ व १२ यांचे शाखेने सुमारे ५५ हापूस आंबा कलमांची लागवड केली आहे. वरील प्रमाणे वादी व प्रतिवादी नं. ४ ते १२ यांचे शाखांनी सन १९७५ पासून २००० पर्यंत लाखो रूपये खर्च करून व स्वत:चे मेहनतीने आपले अंदाजे हिश्याचे क्षेत्रात स्वतंत्र सुधारणा केलेल्या आहेत. त्याप्रमाणे त्यातील उत्पन्नही वादी व प्रतिवादी नं. ४ ते १२ हेच घेतात. दावा मिळकतींचे उर्वरीत क्षेत्रात भातशेती असून वादी व प्रतिवादी नं. ४ ते १२ हे आपल्या अंदाजे हिश्याचे क्षेत्रात भातशेती करतात.

६) वादी व प्रतिवादी यांचे वडीलोपार्जित घर वाडे, ता. देवगड येथे असून सदरहू घर इमल्यात वर नमुद पाच शाखा स्वतंत्रपणे रहातात. सदरहू घराचा ग्रामपंचायत घर नं. ४७६ अ, ब, क, ड, इ, ख असा आहे. सदरहू घर इमला वर नमूद केल्याप्रमाणे ग्रामपंचायत रेकॉर्ड सदरी स्वतंत्रपणे नोंदलेले असून प्रत्येकाचे सोयीप्रमाणे प्रत्येकाचे स्वतंत्रपणे वास्तव्य सदर घर इमल्यात आहे. त्यामुळे आम्हाला सदर इमल्याबाबत वाटपाची दाद मागायची नाही. मात्र प्रतिवादी १ ते ३ अगर अन्य प्रतिवादींकडून घराचे वाटपाबाबत खोटया व खोडसाळ तक्रारी आल्यास सदर घर इमल्याचे याचकामी वाटप होवून मिळावे.

७) प्रतिवादी नं. १ ते ३ यांचे वडील लहानपणापासून मुंबई येथे रहात होते. ते अगर प्रतिवादी नं. १ ते ३ हे गावी कधिही आलेले नाहीत अगर दावा मिळकतीमध्ये कधिही त्यांनी कोणत्याही प्रकारे वहिवाट केलेली नाही अगर कोणत्याही सुधारणा केलेल्या नाहीत. प्रतिवादी नं. १ ते ३ अगर त्यांचे वडील शंकर यांनी दावा मिळकतींचा शेतसारा कधीही भरलेला नाही. वडीलोपार्जित घरातील आपल्या भागाची दुरूस्तीही केलेली नाही अगर घरपट्टीही भरलेली नाही. मुळात

प्रतिवादी नं. १ ते ३ यांना आपले गाव कुठे आहे याची माहितीही नाही. मात्र सध्या कोकणात होत असलेल्या खरेदी विक्री व्यवहाराचा गैरफायदा घेवून आपल्या अविभक्त हिश्याचे क्षेत्र त्रयस्त इसमास परस्पर विकून टाकण्याच्या तयारीत असल्याचे वादी व अन्य प्रतिवादीना खात्रीलायकरीत्या समजले. वादी व अन्य प्रतिवादीना प्रतिवादी नं. १ ते ३ यांचे या हेतूचा सुगावा लागताच त्यांनी आपले वकिलांमार्फत दि. २७/१०/२०१० रोजी दुय्यम निबंधक कार्यालय देवगड येथे लेखी कळवून दावा मिळकतींचे वाटपाखेरीज अशा स्वरूपाच्या कोणत्याही हस्तांतरण व्यवहारास विरोध असल्याचे कळविले. तसेच लेखी अर्जही त्याच दिवशी वादी व अन्य प्रतिवादीनी आपल्या वकिलामार्फत तहसीलदार देवगड यांचेकडे दिला. एवढेच नव्हे तर वादी व अन्य प्रतिवादीनी आपल्या वकीलामार्फत दि. ०१/११/२०१० चे दैनिक प्रहार या वृत्तपत्रामध्ये जाहीर नोटिस प्रसिध्द करून दावा मिळकतीसंदर्भातील हस्तांतरणास त्यांचा विरोध असल्याचे जाहिरीत्या कळविले. तरीही प्रतिवादी नं. १ ते ३ हे दावा मिळकतींचे सरस निरस व रहारास्त वाटप झालेखेरीज हस्तांतरण करण्याचे तयारीत असल्याचे वादींना आढळून येताच वादीनी प्रतिवादी नं. १ यांची मुंबई येथील निवासस्थानी भेट घेवून दावा मिळकतीत वादी व अन्य प्रतिवादीनी केलेल्या सुधारणा व दावा मिळकतीचे वाटपाबाबत प्रतिवादी नं. १ ते ३ यांस सुचविले असता प्रतिवादी नं. १ यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली म्हणून दावा मिळकतींचे सरस निरस व रहारास्त वाटप होवून मिळणेसाठी व दावा मिळकतीमधील वादी व प्रतिवादी नं. ४ ते १२ यांनी सुधारणा केलेले क्षेत्र प्राधान्याने त्यांचे हिश्श्यास नेमुन मिळण्यासाठी वादीस प्रस्तूत दावा दाखल करणे भाग पडत आहे. प्रतिवादी नं. १ ते ३ यांनी ठरविल्याप्रमाणे दावा मिळकती समाईक असताही आपला अविभक्त हिस्सा त्रयस्त इसमास हस्तांतरण केल्यास सदरहू त्रयस्त इसमाव्दारे वादीनी सुधारणा केलेले व लागवडीखालील क्षेत्राचा उपभोग घेणेस वादी व प्रतिवादी नं. ४ ते १२ यांना हरकत किंवा आडकाठी येण्याची शक्यता नाकारता येण्याजोगी नाही. तसे झाल्यास वादी व अन्य प्रतिवादींचे पैशाचे स्वरूपात भरून न येणारे असे अपरीमित नुकसान होणारे आहे व दावा मिळकतींचे प्रत्यक्ष वाटपाचे वेळी गोंधळाची परीस्थिती निर्माण होणार आहे. म्हणून या दाव्याचा निकाल होवून दावा मिळकतींचे हद्दीमेरेनीशी वाटप होईपर्यंत प्रतिवादी १ ते ३ यांनी दावा मिळकतीमधील आपला अविभक्त हक्कसंबंध त्रयस्त इसमास हस्तांतरण करू नये असा प्रतिवादी १ ते ३ विरूध्द कायमचे ताकिदीचा आदेश होणेसाठीही वादीस प्रस्तूत दावा दाखल करणे भाग पडत आहे.

८) तरी आमचा दावा खर्चासह मंजूर करणेत येवून दावा मिळकतींचे सरस निरस व रहारास्त वाटप करणेत येवून दावा मिळकतीमधील वादी नं. १ व प्रतिवादी नं. ५ व ६ यांचे शाखेचे १/५ हिश्याचे तसेच वादी नं. २ व प्रतिवादी नं. ४ यांचे शाखेचे १/५ हिश्याचे वाटप होवून मिळावे. तसेच दावा मिळकतींचे वाटप करताना वादी नं. १ व २ तसेच प्रतिवादी ४ ते १२ यांचे शाखांनी



Asst.
Civil Court,

सुधारणा करून लागवड केलेले क्षेत्र प्राधान्याने संबंधित शाखांच्या हिश्यास नेमुन देण्यात यावे. सदर दावा मिळकतींचे वाटप होईपर्यंत प्रतिवादी नं. १ ते ३ यांनी दावा मिळकतीमधील त्यांचा अविभक्त हिस्सा कोणाही त्रयस्थ व्यक्तिस हस्तांतर करू नये अथवा कोणाही त्रयस्थ व्यक्तीचा दावा मिळकतीत हक्कसंबंध प्रस्थापित करू नये म्हणून प्रतिवादी नं. १ ते ३ यांना कायमची ताकीद देववावी.

९) प्रस्तुत दाव्याचे कामी प्रतिवादी नं. २ यांनी निशाण ७६ येथे, प्रतिवादी नं. १ व ३ यांनी निशाण ८३ येथे दिलेल्या कैफियतीमधील सर्व मजकूर खोटा व खोडसाळ असून तो आम्हाला मान्य व कबुल नाही.

१०) प्रस्तुत दाव्याचे कामी निशाण ६ ते ३७ येथे दावा मिळकतीचे सातबारा उतारे दाखल केले आहेत. तसेच यादीसोबत मौजे वाडा येथील फेरफार नं. ६८९८ मधील मेळाची फाईल, मौजे वाडा येथील फेरफार नं. ६४० मधील मेळाची फाईल इत्यादी कागदपत्र मे. कोर्टात दाखल केले आहेत. वरील सर्व कागदपत्रांस निशाण देणेत येवून ते पुराव्याचे कामी वाचण्यात यावे.

तरी वादीचा दावा खर्चासह मंजुर करणेत यावा.

वरील परि. १ ते १० मधील सर्व मजकूर माझे माहिती प्रमाणे खरा व बरोबर असून हे ॲफिडेव्हिट आज रोजी देवगड येथे पुरे केले.

ता. २५/११/२०१६

ओळखले

(वि. आ. बोर्डे)
(ॲड. कणकवली)

Solemnly affirmed before Shri. Maruti Sakharam Tawade
who is identified before
by Adv. clerk Shri. V. A. Borje.
whom I personally know.
Devgad 25th Nov. 2016

Asstt. Supdt.
Civil Court, Devgad

Supdt.
Devgad

वादीचा पुढील सरतपास शपथेवर सुरु

११. मी मारुती सखाराम तावडे, वय सु. ८१

धंदा-निवृत्त, रा.मु.पो.वाडा, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग आजरोजी न्यायालयासमक्ष शपथेवर कथन करतो की, उपरोक्त सरतपासातील सर्व मजकूर खरा व बरोबर असुन तो मला मान्य व कबुल आहे. त्यावर माझी स्वाक्षरी आहे.

सरतपास संपला

उलटतपास तहकूब

दिनांक :- २५/११/२०१६

श्रवणोत्तर लिखित

दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)
देवगड

वादीचा प्र.वादी तर्फे उलटतपास शपथेवर सुरु

१२ प्र.वादी क्र. ४ ते १२ वादीला सामील असल्याने त्यांच्यातर्फे उलटतपास नाही.

दि. १८/१/२०१७

श्रवणोत्तर लिखित

दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)
देवगड

वादीचा प्र.वादी क्र.१,२ तर्फे उलटतपास

१३ प्र.वादी व विधिज्ञ पुकारता गैरहजर सबब प्र.वादी क्र.१,२ तर्फे उलटतपास नाही.

दि. २५/०२/२०१७

श्रवणोत्तर लिखित

दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)
देवगड

Asstt. Supdt.
Civil Court, Devgad

नि.दि.मु.क्र.८८/२०१० नि.१४९ लगत.

१४. नि.१५४ वरील आदेशानुसार प्रतिवादी नं.२ यांनी पुंर्तता केलेने त्यांचेविरुध्द वादीचा उलटतपास नाही असा झालेला आदेश रद्द करणेत येत असुन त्यांना वादीचा उलटतपास घेणेस परवानगी देणेत येत आहे.

दिनांक—१२/०७/२०१७. दिवाणी न्यायाधीश क.स्तर
देवगड

उलटतपास वादी यांचा प्रतिवादी नं.२,१८,२० व २१ तर्फे विधीज्ञ श्री.आर. व्ही.रावराणे यांचेमार्फत शपथेवर सुरु :—

१५. हे म्हणणे खरे आहे की, परशुराम आबाजी तावडे हे माझे चुलते आहेत. हे म्हणणे खरे आहे की, परशुराम याला एक मुलगा शंकर व प्रतिवादी क्र.१८ ते २१ या चार मुली होत्या. शंकर हयात नाहीत. ते मुंबईला राहायचे. प्रतिवादी क्र.१ ते ३ हे शंकरचे वारस आहेत. प्रतिवादी क्र.१ हा अविवाहीत मयत झाला. हे म्हणणे खरे आहे की, तो व्यसनी होता. प्रतिवादी क्र.१ ते ३यांना मी सुरुवातीपासूनच ओळखतो. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.२ हीचे बनावट मुखत्यारपत्र तयार करुन तिच्या हिश्श्याची मिळकत प्रतिवादी क्र.१३ याला विक्री केली आहे अशी तक्रार प्रतिवादी क्र.२ हीने केली आहे. त्यानुसार गुन्हा दाखल झाला, त्यामध्ये माझा जबाब नोंद झाला आहे, त्याबाबत दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. त्या प्रकरणी प्रतिवादी क्र.१,३,१३ हे सह आरोपी आहेत.

१६. प्रतिवादी क्र.१ व ३ यांनी प्रतिवादी क्र.२ चे बनावट मुखत्यारपत्राआधारे प्रतिवादी क्र.१३ याला जमीन विक्री केली अशी तक्रार प्रतिवादी क्र.१३ याने केली असून त्याप्रमाणे गुन्हा नोंद होवून त्याबाबत दोषारोपपत्र दाखल झाले आहे, त्याप्रकरणी प्रतिवादी क्र.१ व ३ हे सह आरोपी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.१३ याच्या नावे करुन दिलेल्या खरेदीपत्राच्या मिळकतीमध्ये आमच्याच कुटूंबाची वहीवाट असून प्रतिवादी क्र.१३ याची वहीवाट नाही.

२५/०७/१७.

उलटतपास वादी यांचा प्रतिवादी नं.२ तर्फे पूर्ण.

उलटतपास प्रतिवादी नं.३ तर्फे विधीज्ञ श्री.रानडे यांचेमार्फत शपथेवर सुरु —

१७. आबाजी साबाजी तावडे यांना मी पाहीले नव्हते. आबाजी यांचा मृत्यू

किती तारखेला अगर किती साली झाला हे मला सांगता येणार नाही. दावा मिळकतीसहीत इतर ब—याच मिळकती आबाजी साबाजी तावडे यांच्या मालकीच्या होत्या. या मिळकती मौजे वाडा, वाडातर व पडवणे या तीन गावामध्ये विखुरलेल्या होत्या. सदरची तिनही गावे एकाच गावातून निर्माण झाली. त्या मूळ गावाचे नाव वाडा होय. वाडा गावाचे विभाजन आबाजी साबाजी तावडे यांच्या पश्चात झाले. सदर विभाजन किती साली झाले हे मला आठवत नाही. आबाजी साबाजी तावडे यांना बंधू नव्हते. आबाजी साबाजी तावडे यांच्या नांवे वाडा गावी स्थावर मिळकतींचे खाते होते. त्याचा खाते क्रमांक मला आठवत नाही. मी त्यांच्या खात्याचा उतारा पाहीला नाही. त्यांच्या खात्यावर दावा मिळकती व्यतिरिक्त अन्य किती मिळकती होत्या, हे मला सांगता येणार नाही. त्यांच्या पश्चात त्यांच्या मिळकतीबाबत वारस तपास झाला. वारस तपास किती साली झाला हे मला आठवत नाही. वारस तपासाच्या फेरफार नोंदीचा उतारा मी घेतला. वारस तपासाच्या नोंदीचा उतारा मी घेतला असेल पण आठवत नाही. सदर फेरफाराचा क्रमांक मला आठवत नाही. एकूण ३१ मिळकतींबाबत वारस तपास झाला. आबाजी यांच्या खात्यावर एकूण ३१ मिळकती नोंद होत्या. आबाजी यांना एकूण पाच मुलगे होते. या पाच मुलांच्या नांवे स्वतंत्र खाते अस्तित्वात आहेत. या मुलांची खाते फोड सन १९९३ साली झाली. सदर खाते फोडचा फेरफार क्रमांक मला आठवत नाही. खाते फोड झाल्यानंतर वेगवेगळया खात्यांचा स्वतंत्र दस्त घेण्यात येवू लागला. दावा दाखल तारखेस वहीवाटी वेगवेगळया होत्या. सन १९९१ मध्ये वेगवेगळया वहीवाटी झाल्या.

<u>**प्रश्न**</u>— दि.७/५/१९९५ रोजी अनिल लाडकोजी तावडे, तुम्ही, नामदेव शिवराम तावडे, आबाजी लक्ष्मण तावडे, शंकर परशुराम तावडे यांनी मिळून दत्तात्रय हरी कांबळी यांना दावा मिळकतीपैकी काही मिळकत हापूस कलमी आंब्याची झाडे लावून विकसीत करण्याचे कराराने दिली होती ?

( सदर प्रश्नाबाबत प्रस्तुत प्रतिवादी यांनी कैफियतीत कथन केले नाही, त्यामुळे हा प्रश्न आवश्यक नाही, त्यामुळे तो विचारता येणार नाही अशी हरकत वादीतर्फे विद्वान विधीज्ञांनी घेतली. दोन्ही बाजूचा युक्तीवाद ऐकण्यात आला. वादीने दाव्यामध्ये त्याने व प्रतिवादी क्र.४ ते १२ यांच्या शाखांनी सन १९७५ ते सन २००० पर्यंत दावा मिळकतीमधील क्षेत्रात हापूस कलमांची स्वखर्चाने लागवड केली आहे असे कथन केले आहे. प्रस्तुत प्रतिवादी यांनी त्यांच्या कैफियतीमध्ये सदरची बाब स्पष्टपणे नाकारली आहे. त्यामुळे दावा मिळकतीमध्ये वादी यानी कलमांची लागवड केली किंवा अन्य कोणी केली याबाबत वादीला उलटतपासामध्ये सदरचा

प्रश्न विचारणे कोणत्याही प्रकारे अनावश्यक वाटत नाही. तसेच भारतीय पुरावा अधिनियम कलम १३८ अन्वये केवळ साक्षीदाराच्या पुराव्यासंदर्भातच उलटतपास घेण्यात यावा इतकीच मर्यादीत उलटतपास नसून साक्षीदाराची विश्वासार्हता तपासण्यासाठी अशा प्रकारचे प्रश्न आवश्यक आहेत असे मला वाटते. सबब हरकत फेटाळण्यात येते.)

**उत्तर** — हे म्हणणे खरे आहे.

१८. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, शंकर परशुराम तावडे याने सदर करारावर सही करण्यास नकार दिला. अनिल लाडकोजी तावडे, मी, नामदेव शिवराम तावडे, आबाजी लक्ष्मण तावडे, दत्तात्रय हरी कांबळी यांनी साक्षीदारांसमक्ष सदर करारावर सहया केल्या. सदर साक्षीदारास मूळ करार दाखविण्यात आला. सदर करारावर माझी सही नाही. सदर करारावर शंकर परशुराम सोडून इतरांच्या सहया आहेत हे मी सांगू शकत नाही. दत्तात्रय हरी कांबळी व आमच्यामधील लिखित स्वरुपातील मूळ करारपत्र माझ्याकडे आहे. सदर करारपत्र रु.५०/—च्या मुद्रांकावर असेल. सदर करारपत्र एकूण सात मिळकतींकरिता होते. सदर सात मिळकतींचे नवीन व जुने सर्वे क्रमांक, हिस्सा क्रमांक सदर करारामध्ये टंकलिखित केले होते. हे म्हणणे खरे नाही की, वाडे गावातील ७ व पडवणे गावातील ३ मिळकती या करारपत्रात नमूद होत्या. एकूण किती क्षेत्राबाबत सदर करार होता, हे मी सांगू शकत नाही. एकूण क्षेत्र सदर करारात टंकलिखित केलेले असेल. सन १९९५ च्या काळातील अधिकार अभिलेखाचे उतारे मी पाहीले आहेत का, हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर उता—यामधील शेरा कोष्टकी कलमांची नोंद नव्हती. दि. ७/५/१९९५ नंतर या दहा मिळकतींच्या उता—यामध्ये शेरा कोष्टकी कलमांची नोंद झाली. दि.७/५/१९९५ नंतर दहा मिळकतींमध्ये एकूण किती कलमांची लागवड केली हे मी सांगू शकत नाही. दि.७/५/१९९५ नंतर किती कालावधीनंतर कलमांची लागवड झाली याची मला माहीती नाही. सदर दहा मिळकतींपैकी प्रत्येक मिळकतींमध्ये अंदाजे किती कलमांची लागवड झाली याची मला माहीती नाही. वाडा येथील मिळकतींमध्ये २२० कलमांची लागवड केली. पडवणे येथील मिळकतींमध्ये किती कलमांची लागवड केली, हे मी सांगू शकत नाही. या दहा मिळकतींपैकी एका तरी मिळकतीचा सर्वे क्रमांक, हिस्सा क्रमांक मी सांगू शकत नाही. करारपत्रातील सर्व

जमीनी आबाजी साबाजी तावडे यांच्या पासूनच्याच आहेत. दावा मिळकतीपैकी कोणत्या मिळकती करारपत्रात नाहीत हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, या दहा जमीनी कलमांची लागवड करण्यापूर्वी दगडी गडग्याने बंदीस्त करण्यात आल्या. किती फुटाचे गडग्याचे बांधकाम झाले हे मी सांगू शकत नाही. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, पूर्वीपासुन दोन बाजूंनी गडगा अस्तित्वात होता. सदर गडग्यासाठी व कलम लागवडीसाठी एकूण किती खर्च झाला हे मी सांगू शकत नाही. गडग्यासाठी व कलम लागवडीसाठी एकूण किती मजूर व कोण होते हे मी सांगू शकत नाही. ज्यांनी कलम लागवड केली व गडग्यासाठी खर्च केला त्यांना आम्ही मोबदला म्हणून पैसे दिले. ज्यांनी हा खर्च केला त्याला वडीलोपार्जीत मिळकतीचा भाग विकून पैसे दिले. चौघांच्या हिश्श्याचे पैसे दिले. जो भाग विकला त्याचे क्षेत्र मी सांगू शकत नाही. सदरचा भाग दत्तात्रय कांबळी यांना विकण्यासाठी दिला. आम्ही चौघांनी दत्तात्रय कांबळी यांना सदर वडीलोपार्जीत भाग विकून सदर खर्चाचे पैसे देवून टाका असे सांगीतले होते. सदर विक्री केलेला भाग दाव्यामध्ये समाविष्ठ आहे का हे मला दावा परिशिष्ठ पाहून देखील सांगता येणार नाही. सदरचे क्षेत्र किती आहे हे मला घरी जावून पाहील्याशिवाय सांगता येणार नाही. सदर करारातील दहा मिळकती व्यतिरिक्त सर्वे क्र.१५२ हि.क्र.२, स.क्र.८४ हि.क्र.२, सर्वे क्र.९० हि.क्र.३, स,क्र,१०१ हि.क्र.२८ या मिळकतींमध्ये आम्ही चौघांनी आपापली कलमे लावली आहेत. या चार जमीनी आबाजी साबाजी तावडे यांच्या मालकी पासूनच्या आहेत. या चार मिळकती दाव्यामध्ये समाविष्ठ नाहीत. कारण या चार जमीनी आमच्या चौघांच्याच आहेत असे माझे म्हणणे आहे. या चार जमीनींच्या उता—याला शंकर परशुराम तावडे याचे नाव नोंद आहे.

न्यायालयाची कामकाजाची वेळ संपल्यामुळे पुढील उलटतपास तहकूब केला.

श्रवणोत्तर स्वीकृत

दि.१२/०७/२०१७

दिवाणी न्यायाधीश क.स्तर
देवगड.